


RNI NO-MAHMAR/2022/90217

दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

संपादक : जितेंद्र कायस्थ

Email- jansanchlan@gmail.com
Mob- 9822720784




वर्ष ३ रे | अंक : १५७ वा | शुक्रवार दि. ०१ ऑगस्ट २०२५ | पृष्ठ ८ | किंमत ३ रुपये

# मालेगाव निकालानंतर मुख्यमंत्र्यांची एकाच वाक्यात प्रतिक्रिया, तर शिंदेंनीही व्यक्त केला आनंद...

**-वृत्तसंस्था/मुंबई**

मालेगाव बॉम्बस्फोट प्रकरणातील कथित सात आरोपींची न्यायालयाने निर्दोष मुक्तता केल्यानंतर या प्रकरणातील आरोपींची सुरुवातीपासून पाठराखण करणाऱ्या नेत्यांकडून आनंद व्यक्त केला जात आहे. महाराष्ट्रात भाजप आणि शिवसेनेनं हे प्रकरण समोर आल्यापासून साध्वी प्रज्ञासिंह यांच्यासह इतर कथित आरोपींना विनाकारण या प्रकरणात गोवल्याचा आरोप केला होता. न्यायालयाने आज आरोपींची निर्दोष मुक्तता केल्यानंतर राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सूचक पोस्ट केली असून उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आनंद व्यक्त केला आहे. दहशतवाद हा भगवा कधीच नव्हता, आताही नाही आणि भविष्यातही असणार नाही, असं देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे. तर दुसरीकडे उपमुख्यमंत्री शिंदे यांनी सत्य कधीच पराजित होत नसल्याचं म्हटलं आहे. न्यायालयाच्या निर्णयावर एकनाथ शिंदे म्हणाले की, ङ्गसतरा वर्षांच्या दीर्घ लढाईनंतर मालेगाव बॉम्बस्फोटातील सात कथित आरोपींची विशेष न्यायालयाने निर्दोष मुक्तता केली. न्यायाला उशीर झाला हे खरं आहे, पण सत्य कधीही पराभूत होत नसतं, हे आज पुन्हा एकदा सिद्ध झालं आहे. मालेगावच्या स्फोटांप्रकरणी खोटे आरोप करुन तुरुंगात डांबण्यात आलेल्या देशभक्तांना शिवसेनेनं पहिल्यापासूनच जाहीरपणे पाठिंबा दिला होता. कारण आपली बाजू न्यायाची आहे, याबद्दल शिवसेनेला कधीही शंका नव्हता. कर्नल पुरोहित, साध्वी प्रज्ञा आदी सात जणांना या आरोपामुळे प्रचंड मानसिक आणि शारीरिक छळ सहन करावा लागला. हा अन्याय हिंदू जनता कधीही





विसरणार नाही, असं शिंदेंनी म्हटलं. दरम्यान, हिंदू कधीही देशविरोधी कृत्य करू शकत नाही, कारण देशभक्ती हे हिंदूधर्मीयांसाठी धर्मकार्यच असतं. हिंदू दहशतवादफ नावाचा भंपक शब्द काँग्रेसी षडयंत्रकारी नेत्यांनी चलनात आणला. त्यांच्याकडे आता काय उत्तर आहे? एक काळंकुट्ट पर्व आज संपलं असून हिंदू धर्मीयांवरचा कलंक पुसला गेला आहे. ङ्गगर्व से कहो हम हिंदू हैफ ही घोषणा आता शंभरपट मोठ्या आवाजात देशभर दुमदुमेल, यात शंका नाही, असा विश्वासही एकनाथ शिंदेंनी व्यक्त केला आहे.

---

# जिल्हास्तर नेहरू कप हॉकी स्पर्धा; सहभागासाठी ३ ऑगस्टपर्यंत नोंदणी करा

**जनसंचलन/बुलढाणा**

क्रीडा व युवक सेवा संचालनालय, पुणे तसेच जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय व जिल्हा क्रीडा परिषद, बुलढाणा यांच्या संयुक्त विद्यमाने सन २०२५-२६ या वर्षासाठी जिल्हास्तर नेहरू कप हॉकी क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धांमध्ये सबज्युनिअर (१५ वर्षांखालील मुले), ज्युनिअर (१७ वर्षांखालील मुले व मुली) अशा गटांचा समावेश आहे. स्पर्धेचे आयोजन दि. ५ ऑगस्ट २०२५ रोजी सहकार विद्या मंदिर, बुलढाणा येथे करण्यात आले आहे. या स्पर्धेत सहभागी होऊ इच्छिणाऱ्या शाळा/संघांनी आपली ऑफलाईन नोंदणी दिनांक ३ ऑगस्ट २०२५ पर्यंत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, जिल्हा क्रीडा संकुल, क्रीडा नगरी, जांभरून रोड, बुलढाणा येथे करणे आवश्यक आहे. नोंदणीसह संघांची यादी जोडणे बंधनकारक आहे. विहित मुदतीनंतर कोणत्याही संघाचा अर्ज स्वीकारला जाणार नाही. अधिक माहितीसाठी राज्य क्रीडा मार्गदर्शक (फुटबॉल) डॉ. जिवन मोहोड यांच्याशी संपर्क साधावा. आवश्यक कागदपत्रे : पात्रता प्रमाणपत्र जन्मदाखला (मूळ प्रत), आधार कार्ड, पासपोर्ट (मूळ प्रत), १५ वर्षाखालील खेळाडूंना वैद्यकीय प्रमाणपत्र अनिवार्य आहे. प्रवेश अर्जावर खेळाडूचे संपुर्ण नाव, जन्मतारीख, वर्ग, आधार क्रमांक, शाळेचे नाव व पत्ता, शाळेचा यु-डायस क्रमांक, खेळाडूची स्वाक्षरी, रजिस्टर नंबर, मोबाईल क्रमांक, संस्था प्रमुख/मुख्याध्यापक यांची स्वाक्षरी आवश्यक राहिल. स्पर्धेत सहभागी खेळाडूंनी त्यांच्या वयानुसार योग्य कागदपत्रांसह उपस्थित राहणे आवश्यक आहे. राष्ट्रीय पातळीवर निवड झाल्यास खेळाडूंची वैद्यकीय तपासणी करण्यात येणार आहे. कोणत्याही प्रकारे वयोमर्यादा ओलांडल्याचे आढळल्यास संपूर्ण संघ बाद करण्यात येईल, याची सर्व संघांनी नोंद घ्यावी. या स्पर्धेमुळे विद्यार्थ्यांना त्यांच्या कौशल्याची



प्रचिती देण्यासह जिल्हास्तरावर प्रतिनिधित्व करण्याची संधी उपलब्ध होणार आहे. तरी बुलढाणा जिल्ह्यातील शाळांनी या स्पर्धेत सहभाग नोंदवावा, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी बि.एस. महानकर यांनी केले आहे.

दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# आखाती देशांची अरबी चिंता...

## संपादकीय लेख

सौदी अरेबियाची राजधानी रियाध येथे दोन आठवड्यांपूर्वी एक आगळं प्रदर्शन भरलं होतं. ते होतं, अरबी अक्षरांचं. आपली संस्कृती, वारसा आणि अस्मिता दृढ करणाऱ्या या अक्षरांचं सौंदर्य जगाला दाखविणं हा यामागचा एक उद्देश. त्याचबरोबर, आपल्या भाषेकडं जगाला आकर्षित करून त्याद्वारे सांस्कृतिक पर्यटनाला चालना देणं हा दुसरा एक उद्देश. अरबी ही केवळ एक भाषा नाही; तर ती इस्लामी संस्कृतीची वाहक आहे. पवित्र कुराणाची ही भाषा संपूर्ण इस्लामी जगतासाठी एक वारसा आहे. त्याचं केवळ जतनच नव्हे, तर संवर्धन करण्याचं लक्ष्य असलेल्या सौदी अरेबियाच्या ङ्कव्हिजन २०३०फच्या अंमलबजावणीचा एक भाग म्हणूनही हे प्रदर्शन आयोजिण्यात आलं होतं. अरबी भाषा ही काही सौदी अरेबियापुरती मर्यादित असलेली भाषा नाही. सौदीबरोबरच कतार, कुवेत, ओमान, बहारिन आणि संयुक्त अरब अमिराती या आखाती सहकार्य परिषदेच्या (जीसीसी) देशांमधील ती प्रमुख भाषा आहेच; परंतु २६ देशांत तिला अधिकृत भाषेचा दर्जा आहे. भाषकांच्या संख्येच्या निकषावर जगातील पाचव्या क्रमांकाची भाषा असलेली अरबी ही धर्माची आणि संस्कृतीच नव्हे, तर ज्ञान-विज्ञानाची, शिक्षणाची आणि उद्योगाचीही भाषा आहे. जगभरातील चाळीस कोटींहून अधिक लोक ही भाषा जाणतात. त्यामुळे अरबीसमोर अस्तित्वाचा प्रश्न नाही; परंतु इंग्लिशचं वाढतं आकर्षण आणि अन्य देशांतून आलेले स्थलांतरित यांमुळे आखाती देशांतच अरबी न बोलणाऱ्यांची वाढत असल्याची चिंता त्यांना भेडसावत आहे. त्यामुळेच भाषाविषयक प्रदर्शनाबरोबरच अरबी शिकविण्यापर्यंतचे उपक्रम तिथे राबविले जात आहेत. आखाती देशांतील स्थलांतरितांची संख्या ही तेथील लोकसंख्येच्या निम्म्याहून अधिक असून, त्यांपैकी बहुतेकांना अरबी भाषा येत नाही. कामगार आणि कर्मचाऱ्यांच्या एकूण संख्येपैकी अरबी भाषक नसलेल्यांचे प्रमाण याहून अधिक आहे. एकट्या कतारमध्ये हे प्रमाण ९५ टक्के आहे! आपल्या देशांतील निम्म्यापेक्षा अधिक लोकसंख्येला आपली भाषा न येणं म्हणूनच ङ्कजीसीसीफ देशांना चिंताजनक वाटत असून, ही संख्या अशीच वाढल्यास आपली अरबी अस्मिताही धोक्यात येऊ शकते, अशी भीती तेथील काही जण व्यक्त करीत आहेत. या भीतीमागे दोन ठळक कारणं आहेत. पहिलं कारण स्थलांतरित कामगारांचं आहे. स्थलांतरितांत प्रामुख्यानं दक्षिण आणि आग्नेय आशियाई देशांतील कामगार आहेत. ङ्कते ज्या देशांतून आले आहेत, तेथील संस्कृतीही संपन्न आहे. आखाती देशांत आल्यावरही ते विविध उपक्रमांद्वारे आपली भाषा आणि संस्कृती



स्वत:पुरता टिकविण्याचा प्रयत्न करतात. ते अरबी भाषा शिकत नाहीत; किंवा अर्धवट शिकतात. अरबी बोलताना ते आपल्या भाषांतील शब्द अरबीत घुसवतात. यामुळे अरबी भाषा दूषित होत आहे,फ असं मत तेथील काही अभ्यासक मांडत आहेत. स्थलांतरितांना अरबी शिकवितानाच अरबी संस्कृती अधिक ठळक करण्यासाठी काय करता येईल, याबाबत २०१३मध्ये सौदी अरेबियात परिषद झाली होती. आशियाई देशांतून आलेले लोक जी मोडकी-तोडकी अरबी बोलतात, त्याचा परिणाम अरबी मुलांच्या भाषेवर होत असल्याचा शोधनिबंध या परिषदेत सादर करण्यात आला होता. दुसरं कारण आहे, ते इंग्लिशच्या आकर्षणाचं. आखाती देशांतील शिक्षण अरबी माध्यमातील असलं, तरी इंग्लिश माध्यमाच्या शाळा वाढताहेत. या देशांतील तरुण आता अरबीपेक्षा इंग्लिशमधून अधिक प्रमाणात व्यक्त होत असल्याचा अहवाल मध्यंतरी प्रसिद्ध झाला होता. उत्तर आफ्रिकी देशांत फ्रेंच भाषेमुळे अरबी धोक्यात आली, तसेच पश्चिम आशियातून इंग्लिशमुळे अरबी धोक्यात येईल, अशी भीती व्यक्त केली जाते. हा धोका दूर करण्यासाठी अरबी भाषेचं शिक्षण वाढविण्याच्या, सर्व कार्यालयीन कामांत केवळ अरबीचाच वापर करण्यावर भर देण्याच्या उपाययोजना केल्या जात आहेत. भाषा कितीही संपन्न असली, तरी ती टिकविण्यासाठी असे प्रयत्न करावे लागतात, हेच याचं सार म्हणता येईल.

# बॉक्स ऑफिस गाजवलं,वरही केलं अधिराज्य आता वर येणार फुलवंती!

वृत्तसंस्था/मुंबई

अभिनेत्री च्या फुलवंतीने २०२४ मध्ये बॉक्स ऑफिस गाजवले होते. ११ ऑक्टोबर २०२४ रोजी रीलिज झालेल्या या सिनेमाने थिएटरमध्ये ५० दिवसाहून अधिक काळ अधिराज्य केले. त्यामुळे गेल्यावर्षी बॉक्स ऑफिसवर या सिनेमाचा डंका पाहायला मिळाला. त्यानंतर २२ नोव्हेंबर २०२४ पासून हा सिनेमा प्राइम व्हिडिओ या ओटीटी प्लॅटफॉर्मवरही उपलब्ध आहे. ओटीटीवरही रीलिज झाल्यानंतर काहीच दिवसात लाखो प्रेक्षकांनी हा चित्रपट पाहिला होता. थिएटर किंवा ओटीटी प्लॅटफॉर्मवर ज्यांना हा सिनेमा पाहता आला नाही, त्यांच्यासाठी एक खूशखबर आहे. घरबसल्या अगदी मोफत फुलवंती पाहता येणार आहे. जाणून घ्या, कसं आणि कुठे?प्राजक्तासाठी हा सिनेमा तिच्या करिअरमधील एक मोठा टप्पा आहे. कारण तिने फुलवंतीच्या माध्यमातून निर्मिती क्षेत्रात पाऊल ठेवले. अलीकडेच पार पडलेल्या फिल्मफेअर मराठी पुरस्कार २०२५ या सोहळ्यात या चित्रपटाने सर्वाधिक ७ पुरस्कार जिंकले. प्राजक्तानेही या सिनेमासाठी सर्वोत्कृष्ट अभिनेत्री हा फिल्मफ ेअर पुरस्कार पटकावला. प्राजक्ताचे चाहत्यांसाठी आणखी




एक आनंदाची बातमी म्हणजे, आता हा चित्रपट टीव्हीवर पाहता येणार आहे.फुलवंतीचा वर्ल्ड टेलिव्हिजन प्रीमयर झी टॉकीजवर होणार आहे. या वाहिनीवर रविवार १० ऑगस्ट रोजी दुपारी १२ वाजता आणि संध्याकाळी ६ वाजता हा सिनेमा प्रसारित होणार आहे. झी टॉकीजने शेअ केलेल्या पोस्टमध्ये याविषयी असे कॅप्शन देण्यात आले आहे की, आपल्या नृत्याने सर्वांना मंत्रमुग्ध करणारी फुलवंती, व्यंकटध्वरी नरसिंह शास्त्रींच्या मनावर करु शकेल का राज्य? प्राजक्तानेही ही पोस्ट तिच्या इन्स्टाग्राम प्रोफाइलवर शेअर केली आहे.प्राजक्ताने या सिनेमाद्वारे निर्मितीमध्ये पदार्पण केले होते, तर अभिनेत्री स्नेहल तरडेने फुलवंतीमधून पहिल्यांदाच दिग्दर्शन केले आहे. ती या सिनेमात शास्त्रीबुवांच्या पत्नीच्या भूमिकेत झळकली होती. तर या व्यंकटध्वरी नरसिंह शास्त्रींच्या भूमिकेत अभिनेता गश्मीर महाजनीने मुख्य भूमिका साकारली. या कलाकारांशिवाय सिनेमात क्षितीश दाते, निखिल राऊत, वैभव मांगले, चिन्मयी सुमीत, ऋषीकेश जोशी, मंगेश देसाई, प्रसाद ओक, सविता मालपेकर, दिप्ती लेले, जयवंत वाडकर हे कलाकारझळकलेआहेत.

*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# छत्रपती संभाजीनगरात पोलिस अंमलदाराला फिल्मी स्टाइलने मारहाण; ७ ते ८ जणांचं संतापजनक कृत्य,

**छत्रपती संभाजीनगर:** सातारा भागातील सुधाकरनगर येथे एका एसआरपीमध्ये कार्यरत पोलिस कर्मचाऱ्याशी वाद घालून फिल्मी स्टाइलने दोन कारमधून आलेल्या सात ते आठ गुंडांनी कमरेच्या बेल्टने, लाथाबुक्क्यांनी, फायटरसह चाकूचे वार करून पोलिस अंमलदाराला मारहाण करून जखमी केले. त्यानंतर हल्लेखोर पोलिसाच्या खिशातील पाच हजार रुपये हिसकावून पसार झाले. ही घटना २९ जुलैला सकाळी १०.३० वाजण्याच्या दरम्यान घडली. जखमी पोलिस अंमलदाराचे नाव किशोर लक्ष्मण मालोदे (वय ४०, रा. सप्तशृंगीनगर, सातारा परीसर ) असे आहे.या प्रकरणात जखमी किशोर मालोदे (वय ४०, रा. सातारा) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार,




किशोर मालोदे हे एसआरपीएफ ग्रुप १४ मध्ये पोलिस अंमलदार पदावर कार्यरत आहेत. किशोर मालोदे त्यांच्या साडूच्या घराचे बांधकाम सुरू असल्याने २९ जुलै रोजी सकाळी १०.३० च्या दरम्यान त्यांना भेटण्यासाठी गेले होते. या ठिकाणी त्यांचा ओळखीचा व्यक्ती भरत बापू आला. त्याने किशोर मालोदे यांच्याकडे शेजाऱ्याच्या पाण्याच्या जारचे पैसे मागितले. मालोदे यांनी ङ्गमी तुमचे पैसे देतो,फ असे सांगितले. यानंतर भरत बापू याने आडनाव विचारून पैसे लव्हटे यांच्याकडे असल्याचे सांगितले. मालोदे यांनी संबंधित व्यक्तीला ङ्गतू नाव विचारून पैसे मागत जा,फ असे सांगितले. मालोदे असे बोलल्यामुळे भरत बापू याने मालोदे यांच्याशी वाद घातला. या वादानंतर बापू ङ्गतू इथंच थांब मी गुंड घेऊन येतो,फ असे सांगून निघून गेला.किशोर मालोदे यांना भरत बापु याने धमकी दिली. तसेच मोबाइलवर कॉल करून वाहन क्रमांक एमएच २० जीके ७७२७ आणि आय २०च्या एमएच १४ पूर्ण नंबर दिसत नसलेल्या कारमधन सात जण आले. गाडीतून उतरताच एकाने फायटने मालोदे यांच्या तोंडावर मारून जखमी केले. दोन व्यक्तींनी बेल्टने आणि लाथाबुक्क्यांनी मारहाण केली; तसेच त्याच्याकडील चाकूने हल्ला केला. मालोदे यांच्या खिशातील पाच हजार रुपयेही या मारहाणीत काढून घेतले. मारहाण करणाऱ्यांनी जीवे मारण्याची धमकी देऊन भरत बापूसह मारहाण करणारे सातही जण निघून गेले. या घटनेत मालोदे यांच्या नाकाचे हाड मोडले आहे.या मारहाणीचा व्हिडीओ किशोर मालोदे यांच्या साडूच्या बांधकाम साइटवर काम करणाऱ्या मिस्त्रीने रेकॉर्ड केला आहे. या प्रकरणी मालोदे यांच्या तक्रारीवरून त्यांना मारहाण करणाऱ्या भरत बापू, चारचाकी वाहन क्रमांक एमएच २० जीके ७७२७ आणि चार चाकी वाहन आय २० क्रमांक एमएच १४ (पूर्ण नंबर माहिती नाही), अन्य पाच जणांच्या विरोधात सातारा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा तपास पोलिस उपनिरीक्षक एकीलवाले हे करीत आहे.

---

# त्या २ नेत्यांची नावं काढताच भाजप बॅकफूटला

## दादा, भाईच्या वादग्रस्त मंत्र्यांची सुटका

**मुंबई:** विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात शिंदेसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार आणि मंत्री वादग्रस्त ठरले. या नेत्यांमुळे महायुती सरकारची प्रतिमा मलीन झाली. या नेत्यांवर कारवाईसाठी भाजपनं दबाव टाकून पाहिला. मात्र त्याचा काहीही उपयोग झाला नाही. उपमुख्यमंत्री आणि दोन पक्षांचे प्रमुख असलेले एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांनी स्वपक्षीय नेत्यांचा बचाव केला. यासाठी त्यांना भाजपमधल्याच दोन नावांची चांगलीच मदत झाल्याचं समजतं.शिंदेसेनेचे आमदार संजय गायकवाड यांनी मुंबईच्या आमदार निवासातील कँटिन कर्मचाऱ्याला जेवणाच्या निकृष्ट दर्जावरुन मारहाण केली. तर मंत्री संजय शिरसाट विट्स हॉटेल खरेदी प्रकरण, नोटांनी भरलेली बॅगेच्या व्हिडीओमुळे वादात सापडले. प्राप्तिकर खात्यानं त्यांना नोटिसदेखील पाठवली आहे. मंत्री भरत गोगावले अघोरी पुजेमुळे वादात अडकले. तर राज्यमंत्री असलेल्या योगेश कदम यांच्या आईच्या मालकीच्या बारवर छापा पडल्याचा मुद्दा विधिमंडळाच्या चर्चेत उपस्थित झाला. विशेष म्हणजे कदम यांच्या आईच्या नावे असलेल्या बारमध्ये बारबाला अश्लील नृत्य करताना आढळून आल्या.दुसरीकडे कृषीमंत्री माणिकराव कोकाटे यांच्या विधानांमुळे राष्ट्रवादी काँग्रेस अडचणीत आली. विधिमंडळात रमी खेळत असतानाच त्यांचा व्हिडीओदेखील समोर आला आहे. त्यामुळे त्यांच्या राजीनाम्याची मागणी जोर धरु लागली. उपमुख्यमंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष असलेल्या अजित पवारांनी कोकाटे यांना अँटी चेंबरमध्ये बरंच झापलं. पण त्यांचा राजीनामा घेतला नाही.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल सर्व मंत्र्यांना समज दिली. वादग्रस्त विधानं करु नका, वर्तन चांगलं ठेवा, अशी समज त्यांना देण्यात आली. पण फडणवीस यांनी वादग्रस्त नेत्यांवर कारवाई करण्याचं धाडस दाखवलेलं नाही.



यामागील कारणांचा उलगडा आता झालेला आहे. भाजपचे नेते आणि मंत्री गिरीश महाजन यांच्यावर हनी ट्रॅप प्रकरणात गंभीर आरोप आहेत. मात्र त्यांच्यावर कारवाई होत नाही. त्यांचा राजीनामा घेतला जात नाही. असा मुद्दा दोन्ही उपमुख्यमंत्र्यांनी खासगी बैठकांमध्ये उपस्थित केल्याचं समजतं.विधिमंडळाचं अधिवेशन सुरु असताना भाजप चे आमदार गोपीचंद पडळकर यांच्या कार्यकर्त्यांनी विधिमंडळाच्या आवारातच राष्ट्रवादी काँग्रेस शपचे आमदार जितेंद्र आव्हाड यांच्या कार्यकर्त्यांना मारहाण केली. त्यावरुन भाजपनं पडळकर यांच्यावर कोणतीही कारवाई केलेली नाही. भाजप त्यांच्या एका मंत्र्यावर, एका आमदारावर कोणतीही कारवाई करत नाही, असा मुद्दा उपमुख्यमंत्री शिंदे आणि अजित पवारांनी महायुतीच्या बैठकांमध्ये उपस्थित केला. भाजपच्या दोन बड्या नेत्यांची नावं पुढे करुन, त्यांच्यावर न झालेल्या कारवाईचा विषय उपस्थित करुन दोन्ही उपमुख्यमंत्र्यांनी त्यांच्या मंत्र्यांचा बचाव केला.

# खालापूर टोलनाक्यावर कामगाराचे झटपट पैशांसाठी प्रताप, पण अखेर तो अडकलाच, पोलिसांकडून अटक






**रायगड :** खालापूर तालुक्यात जणूकाही झटपट पैसा कमविण्याची शर्यतच सुरू आहे की काय अशीच चर्चा सर्वत्र सुरू झाली असून एका पाठोपाठ एक घटना समोर येत असून गोदरेज कंपनीच्या प्रकरणानंतर आता आय आर बी कंपनी मध्ये सुरक्षारक्षक कंत्राटी स्वरूपात कार्यरत असणाऱ्या कामगाराने आय आर बी कंपनी चा फ्री टोल करण्यासाठी आय आर बी रोड इन्फ्रास्ट्रक्चर कंपनी चा व्ही आय पी पासेस विक्री केल्याचे समोर आले. या बाबत आय आर बी कंपनीच्या वतीने खालापूर पोलीस ठाण्यात तक्रार देण्यात आली होती याबाबत जबाबानंतर पोलीस अधीक्षक रायगड आचल दलाल यांच्या आदेशानुसार खालापूर पोलिसांनी या आरोपीवर गुन्हा दाखल करून आरोपी ला बेड्या ठोकल्या असून त्याला न्यायालयात हजर केले असता खालापूर न्यायालयाने अधिक तपासासाठी २ऑगस्टपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. या प्रकरणात मोठे मासे गळाला लागण्याची शक्यता वर्तविली जात आहे.या बाबत सविस्तर वृत्त असे की खालापूर तालुक्यात सावरोली गावजवळ खालापूर टोल नाका आहे या ठिकाणी स्थानिक कामगारांना सुरक्षारक्षक म्हणून नोकऱ्या दिल्या आहेत यात सावरोली गावातील ओंकार रामचंद्र महाडिक हा आपल्या वडिलांच्या निधनानंतर त्यांच्या जागी घराचा उदरनिर्वाह च्या दृष्टीने आय आर बी कंपनीने ठेकेदारी पध्द्तीवर सुरक्षारक्षक म्हणून कामावर रुजू केला होता. नोकरी करीत असताना या टोल नाक्यावरून येजा करणाऱ्या रायगड सह पुणे मुंबई ठाणे येथील बड्या वाहनांच्या मालकांशी व तालुक्यातील कार्यकर्ते यासह नेत्यांशी ओळख वाढल्याने त्याने झटपट श्रीमंतीची हवा डोक्यात गेल्याने पैसे कमविण्यासाठी शक्कल लढवली. आय आर बी रोड इन्फ्रास्ट्रक्चर कंपनीचा टोल फ्री साठी बोगस व्ही आय पी पास तयार करून मोठा आर्थिक व्यवहार करून अनेकांना विक्री केले.

ते व्ही आय पी कार्ड अनेक टोल नाक्यावर दाखवून पैसे न देता प्रवास सुरू असल्याचे आय आर बी कंपनीच्या अधिकारी जयवंत नारायण देसले यांच्या लक्षात आल्याने याबाबत खालापूर पोलीस ठाण्यात तक्रार दिली होती .दरम्यान खालापूर पोलिसांनी दोन वेळा आरोपी चा जबाब नोंदविला मात्र चौकशी च सुरू असताना नव्याने रायगड जिल्हयाचा पदभार घेणाऱ्या रायगड पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांनी याबाबत माहिती घेऊन तात्काळ खालापूर पोलिस निरीक्षक सचिन पवार यांना आरोपी ताब्यात घेऊन गुन्हा नोंद करून अटक करण्याचे आदेश दिले. आरोपी ओंकार महाडिक याला २९ जुलै रोजी त्याच्या राहत्या घरातून ताब्यात घेऊन गुन्हा नोंद करीत गजाआड केले. ३० जुलै रोजी खालापूर न्यायालयात हजर केले असता २ ऑगस्ट पर्यत पोलीस कास्टडी सुनावली आहे या प्रकरणात अनेकांना बोगस व्ही आय पी पास देऊन त्याचा महाराष्ट्रात अनेक टोल नाक्यावर लाभ घेतल्याने आय आर बी कंपनी ची मोठी फसवणूक झाली. यात मोठे मासे गळाला लागणार अशी चर्चा सुरू असून आता पोलिस तपासाकडे सर्वांचे लक्ष लागले आहेत

# एकनाथ शिंदे दिल्लीला रवाना, महायुतीत काहीतरी मोठं घडतंय का?




**मुंबई :** उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आज पुन्हा एकदा दिल्लीला रवाना झाले आहेत. त्यामुळे अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत. एकनाथ शिंदे अचानक दिल्लीला का गेले? अशी चर्चा राजकीय वर्तुळात आता रंगू लागली आहे. एकनाथ शिंदे याआधी विधीमंडळाच्या पावसाळी अधिवेशनावेळी अचानक रात्रीच्या वेळी दिल्लीला गेले होते. त्यांच्या दिल्ली दौऱ्याची शिवसेनेच्या मंत्र्यांनादेखील कल्पना नव्हती. त्यामुळे राजकीय वर्तुळात त्यांच्या दिल्ली दौऱ्याची चांगलीच चर्चा झाली होती. यानंतर आता पुन्हा एकदा एकनाथ शिंदे हे दिल्ली दौऱ्यावर गेले आहेत. दिल्लीत सध्या संसदेचं पावसाळी अधिवेशन सुरु आहे. या अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर शिंदे दिल्लीला रवाना झाल्याची प्राथमिक माहिती मिळत आहे. एकनाथ शिंदे आपल्या पक्षाच्या सर्व खासदारांसोबत बैठक घेणार आहेत. या बैठकीत अधिवेशनात काय-काय मुद्दे मांडावे याबाबत चर्चा करणार असल्याची माहिती आहे. असं असलं तरी राजकीय वर्तुळात शिंदेंच्या या दिल्ली दौऱ्याची चांगलीच चर्चा सुरु आहे. खरंतर महाराष्ट्राच्या राजकारणात सध्या पडद्यामागे प्रचंड घडामोडी सुरु आहेत. आगामी काळात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका आहेत. तर दुसरीकडे विधीमंडळाचं पावसाळी अधिवेशन सुरु असताना शिवसेनेचे आमदार संजय गायकवाड यांनी कॅन्टीनमध्ये एका कर्मचाऱ्याला केलेल्या मारहाणीवरुन वाद निर्माण झाला होता. तसेच शिवसेना मंत्री संजय शिरसाट यांचा एक व्हिडीओ समोर आला होता. या व्हिडीओत संजय शिरसाट यांच्या बाजूला पैशांनी भरलेली बॅग दिसली होती. यावरुनही मोठा वाद झाला होता. तसेच मंत्री भरत गोगावले यांचा एक फोटो समोर आला होता. यावरुन त्यांच्यावर जादूटोण्याचा आरोप करण्यात आला होता. या सगळ्या घडामोडी सुरु असतानाच मंत्रिमंडळातील वादग्रस्त मंत्र्यांना सरकार घरचा रस्ता दाखवणार असल्याची चर्चा होती. पण अद्याप तरी तसं काही घडलेलं नाही. दुसरीकडे महायुतीच्या सरकारमध्ये सध्या सारं काही आलबेल असल्याचं दाखवलं जात आहे.

पण भाजपच्या काही आमदारांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नगरविकास खात्याबाबत मुख्यमंत्र्यांकडे तक्रार केल्याची चर्चा होती. नगरविकास खात्याकडून केवळ शिवसेनेच्या खात्यांना निधी दिला जातो, असा आरोप काही आमदारांनी केला होता. या तक्रारीची दखल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतली. यापुढे नगरविकास खात्याचा कोणताही निधी देताना अंतिम स्वाक्षरीसाठी आपल्याकडे येईल, असे निर्देश मुख्यमंत्र्यांनी दिले. यामुळे राजकीय वर्तुळात याबाबत चांगलीच चर्चा झाली.एकनाथ शिंदे हे डॅशिंग नेते आहेत. ते स्थानिक पातळीवर जावून काम करणारे नेते आहेत. त्यामुळे ते लोकप्रिय देखील झाले आहेत. त्यांची सर्वसामान्यांमधील नेता अशी प्रतिमा निर्माण झाली आहे. राज्यातला कोणताही सर्वसामान्य माणूस एकनाथ शिंदे यांना सहज भेटू शकतो, अशी स्थिती आहे. त्यामुळे एकनाथ शिंदे यांच्याबाबत लोकांच्या मनात एक वेगळा आदर आहे. असं असलं तरी एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील सरकारने घेतलेल्या काही निर्णयांवर भ्रष्टाचाराचे आरोप झाले. त्यामुळे सध्याच्या सरकारने चौकशीचे आदेश दिल्याची चर्चा आहे. तर शिंदेंनी घेतलेल्या काही निर्णयांना फडणवीस सरकारने ब्रेक दिल्याची चर्चा राजकीय वर्तुळात होत असते.

# घरच्या सन्मानाने भारावली राणी, ग्रँडमास्टर दिव्या देशमुखचे नागपुरात जंगी स्वागत...




**नागपूर :** ऐरव्ही नागपुरात आंतरराष्ट्रीय क्रिकेट सामन्यासाठी येणाऱ्या भारतीय आणि आंतरराष्ट्रीय संघातील क्रिकेटपटूंची एक झलक पाहण्यासाठी चाहते विमानतळावर गर्दी करतात. मात्र, बुधवारी रात्रीचे चित्र काही वेगळे होते. बुद्धिबळ विश्वचषक स्पर्धेचे विजेतेपद पटकावणारी पहिलीच भारतीय महिला ठरलेल्या बुद्धिबळ खेळातील ङ्गराणीफ ग्रँडमास्टर दिव्या देशमुखला पाहण्यासाठी नागपूरकरांनी विमानतळावर गर्दी केली होती. या घरच्या सत्काराने बुद्धिबळाच्या पटावरील ही राणीही भारावली. जॉर्जियात स्पर्धा खेळून मुंबई मार्गे रात्री उशिरा नागपुरात दाखल झालेल्या आपल्या या नव्या ङ्गवर्ल्ड चॅम्पियनफचे नागपूरकरांनी जंगी स्वागत केले. रात्री सव्वाअकराच्या सुमारास दिव्याचे आगमन होणार होते. मात्र, तासभर आधीपासूनच विमानतळावर तिच्या स्वागताची जय्यत तयारी महाराष्ट्र बुद्धिबळ संघटना, नागपूर चेस असोसिएशन आणि इतर संघटनांनी करून ठेवली होती. आई डॉ. नम्रता देशमुख यांच्यासह दिव्या विमानतळाच्या बाहेर येताच उपस्थित सर्वांनी एकच जल्लोष केला.

बाहेर पडताच दिव्याने सर्वप्रथम वडील डॉ. जितेंद्र देशमुख यांना कडकडून मिठी मारली. तर आजीच्या पाया पडत आशीर्वाद घेतला. वर्ल्ड चॅम्पियन दिव्याला बघताच कुटुंबातील सर्व सदस्य भावूक झाले होते. तिच्या स्वागतासाठी लहान मुलांसह त्यांचे पालक, बुद्धिबळप्रेमी यांनी हातात बॅनर, दिव्याचे अभिनंदन करणारे फलक घेऊन तिचे स्वागत केले. ढोलताशे व घोषणांनी विमानतळ परिसर दणाणून गेला होता. लॉबी मध्ये येताच दिव्याला ङ्गटिआराफ घालण्यात आला.विमानतळावर झालेली गर्दी बघता पोलिसांना दिव्याला तिच्या मिरवणूकीसाठी ठेवण्यात आलेल्या जीपपर्यंत पोहचवण्यासाठी चांगलीच कसरत करावी लागली. यावेळी वडील डॉ. जितेंद्र यांच्यासह कुटुंबातील सदस्य उपस्थित होते. विमानतळावर महाराष्ट्र बुद्धिबळ संघटनेचे अध्यक्ष आमदार परिणय फुके, नागपूर चेस असोसिएशनचे अध्यक्ष गिरीश व्यास, ग्रँडमास्टर अभिजित कुंटे, जिल्हा क्रीडा अधिकारी पल्लवी धात्रक, भाजपचे शहराध्यक्ष दयाशंकर तिवारी, महापालिकेचे क्रीडा अधिकारी पीयूष आंबुलकर यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते.ङ्गङ्घहे यश माझ्यासाठी पहिले पाऊल आहे. खेळातील उणिवा दूर करून आणखी चांगली कामगिरी करता येईल, यासाठी प्रयत्न करणार आहे. माझ्या शहरवासीयांनी केलेले उत्स्फूर्त स्वागत हा खूप भावनिक क्षण आहे. यामुळे पुढे आणखी चांगली कामगिरी करण्याची प्रेरणा मिळेलङ्घङ्घ, अशी प्रतिक्रिया दिव्याने व्यक्त केली.

## हिच्यामुळे माझ्या बहिणीचा संसार मोडलाय, अभिनेत्याच्या मेव्हणीनं माधुरी दीक्षितवर केलेले आरोप

**मुंबई:** अभिनेता संजय दत्त याचं फिल्मी करिअर जितकं चर्चेत राहिलं,त्याहून जास्त त्याच्या वैयक्तिक आयुष्याची चर्चा झाली. एकदा नव्हे अनेकदा त्याच्या अफेअर्सच्या चर्चा बॉलिवूडमध्ये रंगल्या. दोन लग्न अपयशी ठरल्यानंतर तो आता तिसरी पत्नी मान्यता दत्त आणि मुलांसोबत आनंदी जीवन जगत आहेत.खलनायक चित्रपटाच्या शूटिंगदरम्यान त्यांच्या वैयक्तिक आयुष्यात अनेक चढ-उतार आले होते. त्याची पत्नी ऋचा शर्मा हिच्यावर परदेशात कॅन्सरचे उपचार सुरू होते. अशा स्थितीत संजय दत्त आणि माधुरी दीक्षित अफेअरच्या चर्चा रंगल्या होत्यामाधुरी दीक्षित यांच्यामुळं संजय दत्तचा संसार मोडला, अशाही चर्चा त्यानेवेळी रंगल्या होत्या. ऋचा शर्मावर अमेरिकेत उपचार सुरू होते, पण आपलं वैवाहिक जीवन वाचवण्यासाठी तिनं अमेरिकेहून मुंबईला परतण्याचा निर्णय घेतला. या काळात संजयनं ऋचाला चुकीची वागणूक दिली,तिच्यासोबत तो खूप



चुकीचा वागला, असं म्हटलं गेलं होतं. ऋचाच्या बहिणीनं माधुरी दीक्षितवर त्यांचा संसार मोडल्याचा थेट आरोप केला होतात्या काळात मासिकांमध्ये संजय दत्त आणि माधुरी यांच्याबद्दल बरंच काही लिहून येत असत. असंही म्हटलं जात होतं की, माधुरीला संजय दत्तचा सहवास आवडायचा. ती त्याच्यासोबत आनंदी होती आणि प्रत्येक मुलाखतीत ती संजय दत्तबद्दल चांगलं बोलत असे. ती संजय आपला आवडता सहकलाकार असल्याची सांगायची.माधुरी दीक्षित आणि संजय दत्त यांच्या अफेअरची चर्चा संजय दत्तची पत्नी ऋचा शर्मापर्यंत पोहोचली, त्यामुळं आपलं लग्न वाचवण्यासाठी ती उपचारादरम्यानच अमेरिकेतून मुंबईला परतली.जेव्हा ऋचा शर्मा मुंबईला परतली, तेव्हा संजय दत्तनं तिला महत्त्व दिलं नाही.यासिर उस्मान यांच्या ङ्गसंजय दत्त : द क्रेझी अनटोल्ड स्टोरी ऑफ बॉलीवुड बॅड बॉयफ या पुस्तकात उल्लेख आहे की, संजय आजारी पत्नी ऋचा आणि मुलगी त्रिशालाला घेण्यासाठी विमानतळावरही गेले नव्हते.संजय माधुरीशी लग्न करणार असल्याचीही बातमी होती. पुस्तकात असाही उल्लेख आहे की, ऋचानं संजयला विचारलं होतं की, तुम्ही मला घटस्फोट देणार आहात का? यावर संजय दत्तनं नाही असं म्हटलं होतं. त्यानंतर संजय दत्तनं माधुरी दीक्षितसोबतच्या नात्याबद्दल सुरू असलेल्या चर्चांना नकार दिल होताऋचाची तब्येत आणखी बिघडली आणि ती उपचारासाठी पुन्हा अमेरिकेला परतली. याच दरम्यान संजयला तुरुंगवास झाला. ऋचाची प्रकृती खालावली आणि अखेर १० डिसेंबर १९९६ रोजी तिचं निधन झालं.

## पत्नीचे अनैतिक संबंध, वेदना असह्य झाल्या, पतीने जीव दिला... लातुरात एकच खळबळ...

**लातूर:** अहमदपूर तालुक्यातील वरवंटी तांडा येथे एका व्यक्तीने आपल्या राहत्या घरी गळफास घेऊन आपल्या आयुष्याची अखेर केल्याची घटना घडली आहे. पत्नीच्या अनैतिक संबंधातून त्याने आपला जीव दिल्याची फिर्याद मयताच्या भावाने दिली असल्यामुळे दोन जणांविरोधात अहमदपूर पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेने परिसरात एकच खळबळ माजली आहे. याविषयी पोलिसांकडून मिळालेल्या अधिक माहितीनुसार, अहमदपूर तालुक्यातील वरवंटी तांडा येथील भिम उत्तम चव्हाण हे आपल्या राहत्या घरातील पलंगावर बेशुध्द अवस्थेत पडले होते. याची माहिती नातेवाईकांना समजताच अहमदपूर येथील खाजगी हॉस्पीटलमध्ये दाखल करण्यात आले असता डॉक्टरांनी सदरील व्यक्तीला मृत घोषित केले. त्यानंतर येथीलच शासकीय ग्रामीण



रुग्णालयात मयताचे शवविच्छेदन करण्यात आले.शवविच्छेदन अवहालात या व्यक्तीने गळफास घेऊन आपलं आयुष्य दिल्याचं निष्पन्न झालं आहे. यासंदर्भात मृताचा सख्खा भाऊ अर्जुन उत्तम चव्हाण याने मृत भावाची पत्नी आणि गावातीलच देवीदास राजाराम चव्हाण यांचे गेले अनेक वर्षापासून अनैतिक संबंध होते. यामुळेच माझ्या भावाने मानसिक ताण तणावातून गळफास घेतला असल्याची फिर्याद अहमदपूर पोलिसात दिली. याप्रकरणी दिलेल्या फिर्यादीवरून अहमदपूर पोलिसात मयताची पत्नी कल्पना भिम चव्हाण आणि देविदास राजाराम चव्हाण यांच्या विरूध्द गुरनं ०५३३ कलम १०८, ३(५), बि. एन. एस प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात येऊन मयताच्या पत्नीस अटक करण्यात आली आहे. पुढील तपास पोलीस उपनिरिक्षक आनंद श्रीमंगल हे करीत आहेत.

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# निवडणुकीपूर्वी नागपूर महापालिकेला सरकारकडून मोठं गिफ्ट; तब्बल ३१५ कोटींचा निधी

**नागपूर :** आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीपूर्वी राज्य सरकारकडून नागपूर महापालिकेला मोठं गिफ्ट देण्यात आलं आहे. राज्य सरकारकडून नागपूर मनपाला आर्थिक बुस्ट देण्यात आलं आहे. पुढील काही महिन्यांत होणाऱ्या महापालिका निवडणुकांच्या तोंडावर राज्य सरकारने नागपूर महापालिकेला महत्वाच्या पायाभूत सुविधा निर्मिती आणि विकासकामांसाठी ३१५ कोटी रुपयांचा निधी दिल्याने मोठा दिलासा मिळाला आहे. राज्य सरकारने दोन स्वतंत्र अध्यादेशांद्वारे १७५ कोटी आणि १४० कोटींचा निधी उपलब्ध करून दिला आहे. या माहितीला महापालिकेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दुजोरा दिला आहे. मंगळवारी महापालिका आयुक्तांनी सर्व विभागप्रमुखांसोबत बैठक घेत कामांसाठीचे नवे प्रस्ताव तातडीने सादर करण्याच्या सूचना केल्याची माहिती आहे.मिळालेल्या एकूण निधीपैकी ७० ते ८० कोटी रुपये दहाही झोनमधील कामांसाठी देण्यात येणार आहेत. या कामांमध्ये नदी आणि नाल्यांच्या संरक्षक भिंती बांधणे, पावसाळी पाणी वाहून जाण्यासाठी वाहिन्यांचे जाळे उभारणे, सांडपाणी वाहिन्या टाकणे, लहान पूल बांधणे आदी कामांचा समावेश आहे. राज्य सरकारकडून मिळालेल्या एकूण निधीपैकी २१५ कोटींचा निधी विधानसभानिहाय आमदारांनी सादर केलेल्या कामांच्या प्रस्तावासाठी देण्यात येणार आहे. यामध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दक्षिण-पश्चिम, कृष्णा खोपडे यांच्या पूर्व, मोहन मतेंच्या दक्षिण नागपूर, प्रवीण दटके यांच्या मध्य नागपूर, विकास ठाकरेंच्या पश्चिम नागपूर आणि नितीन राऊत यांच्या उत्तर नागपूरच्या मतदारसंघाचा समावेश आहे.या प्रकल्पांना पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी मंजुरी दिल्याची माहिती आहे. शहरातील सहापैकी चार मतदारसंघांमध्ये भाजपचे आमदार असल्याने या भागांमधील कामांसाठी जास्तीत जास्त निधी उपलब्ध करून देण्यात येण्याची शक्यता आहे. निधी प्राप्त झाल्यामुळे आता आमदारांकडून त्यांच्या विधानसभा क्षेत्रात प्राधान्याने करायची असलेल्या कामांचे प्रस्ताव देण्यात येत आहे. यामध्ये रस्त्यांचे डांबरीकरण आणि सिमेंटीकरण करणे, गटारांची झाकणे आदी कामांचा यात समावेश आहे. यातील अनेक कामांचे प्रस्ताव हे




तातडीची कामे याअंतर्गत घेण्यात येणार असल्याची माहिती आहे. राज्य सरकारकडून अनेक प्रयत्नांनंतर निधी मिळाल्याने आता महापालिकेचा सार्वजनिक बांधकाम विभाग, सार्वजनिक आरोग्य अभियांत्रिकी, उद्यान आणि क्रीडा विभाग यांना प्रस्ताव तयार करण्यास सांगण्यात आले आहे. ते तातडीने सादर करावेत, जेणेकरून या विभागांशी संबंधित कामे तातडीने मार्गी लागू शकतील. महापालिका प्रशासनाकडूनही मिळालेल्या निधीतून शहराच्या दृष्टीने आवश्यक असलेली मात्र, निधीअभावी रखडलेली कामे निवडणुकांच्या आधी तातडीने पूर्ण व्हावीत, हाच यामागचा उद्देश आहे, असे संबंधित अधिकाऱ्यांनी सांगितले.

### लाडकी बहीण योजनेचा पुरुषांनीही लाभ घेतला

## आता काटेकोर छाननी होणार, अपात्र असलेल्यांकडून रक्कम वसूल करणार...

**मुंबई :** ङ्गमुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेचा लाभ तब्बल १४ हजार पुरूषांनी घेतल्याचे समोर आले आहे. या योजनेच्या संदर्भात आम्ही राज्य तसेच केंद्र सरकारच्या विविध विभागांकडून आकडेवारी गोळा करत आहोत. या आकडेवारीची स्थानिक पातळीवर काटेकोर छाननी करण्यात येत आहे. अपात्र लाभार्थ्यांवर निश्चितच कारवाई करून पैशांची वसुली केली जाईल, असे महिला व बालविकासमंत्री आदिती तटकरे यांनी मंगळवारी स्पष्ट केले.लाभार्थ्यांची छाननी ही निरंतर चालणारी प्रक्रिया असून चुकीच्या लाभार्थींना लाभ मिळू नये, यासाठी सरकार कटिबद्ध आहे. सामाजिक न्याय किंवा इतर कोणत्याही विभागाचा निधी वळवून या योजनेला देण्यात आलेला नसल्याचेही मंत्री तटकरे यांनी स्पष्ट केले. मंत्री तटकरे म्हणाल्या की, २८ जून २०२४ रोजी या योजनेला सुरुवात झाली. २.६३ कोटी महिलांनी नोंदणी केली होती. त्यापैकी २.४७ कोटी महिलांना लाभ देत आहोत. याचाच अर्थ छाननी करण्यात आली आहे.तसेच सर्व विभागांची आकडेवारी आमच्याकडे नसते. ती ज्या पदधतीने येते त्यानुसार छाननी करण्यात येते. जानेवारी महिन्यात कृषी विभागाची आकडेवारी आली. त्याची महिनाभर छाननी करण्यात आली. नमो शेतकरी योजनेचा लाभ घेणा-या महिलांना त्यातून १ हजार तर लाडकी बहीण योजनेमधून ५०० अशा प्रकारे दीड हजारांचा लाभ देण्यात आला. आता १४ हजार




पुरूषांची आकडेवारी समोर आली.आता ज्या पुरुषांच्या खात्यावर योजनेतील लाभाचे पैसे जमा झाले त्यांनी हे जाणीवपूर्वक केले की, घरातील महिलेचे बँक खाते नसल्याने त्यांनी त्यांचे खाते दिले हे तपासून पाहण्यात येणार आहे. ज्या सरकारी कर्मचा-यांनी या योजनेचा लाभ घेतला त्यांच्यावरही कारवाई झाली, असे त्यांनी सांगितलेदरम्यान, नागपूर जिल्ह्यात ६१ हजार १४६ लाभार्थ्यांनी पात्र नसतानाही योजनेचा लाभ घेतल्याचा प्रकार समोर आला आहे. यामध्ये यात आर्थिक स्थिती चांगल्या असणाऱ्या महिलांचा समावेश आहे. तसंच काही पुरुषांचाही योजनेचा लाभ घेतल्याचं समोर आलं आहे. प्रशासनाने आता या लाभार्थ्यांना अपात्र ठरवत योजनेतून हद्दपार केलं आहे.

## कारची काच फोडली अन् २५ लाखांची रोकड लंपास, भर दुपारी चोरट्याचा प्रताप; घटनेने खळबळ

**नागपूर :** नागपूर शहरातील सदर पोलीस ठाण्याच्या हद्दीत मंगळवारी दुपारी चोरीची धक्कादायक घटना समोर आली आहे. फराज सिद्दकी नावाच्या व्यक्तीच्या कारच्या खिडकीचे काच फोडून अज्ञात चोरट्यांनी तब्बल २५ लाख रुपयांची रोकड असलेली बॅग लंपास केली. सिद्दिकी हे यांचे नागपूर जिल्ह्यात पेट्रोल पंप आहे. ही घटना श्रीराम टॉवरच्या समोर घडली आहे. घटनेने परिसरात एकच खळबळ उडाली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, फराज सिद्दिकी हे दुपारी २ ते ३ दरम्यान आपल्या व्यावसायिक भागीदाराच्या ऑफिसमधून २५ लाख रुपयांची रोकड घेऊन बाहेर पडले. त्यानंतर त्यांना श्रीराम टॉवरमध्ये राहणाऱ्या एका मित्राला काही वेळ भेटायचे होते. मात्र टॉवरच्या पार्किंगमध्ये जागा न मिळाल्याने त्यांनी कार टॉवरच्या समोरच्या बाजूला रस्त्यालगत उभी केली आणि मित्राकडे गेले.अर्ध्या ते एक तासाच्या कालावधीनंतर जेव्हा ते परत आले, तेव्हा त्यांनी पाहिले की त्यांच्या कारचा खिडकीचा काचा फोडलेल्या होत्या आणि कारमध्ये ठेवलेली रोकड भरलेली बॅग गायब होती. हे पाहून ते अत्यंत घाबरले आणि लगेचच सदर पोलीस ठाण्यात धाव घेत तक्रार दाखल केली.तक्रारीनंतर सदर पोलीस घटनास्थळी दाखल झाले असून त्यांनी तपास सुरू केला आहे. पोलिसांच्या प्राथमिक तपासात ही चोरी पूर्वनियोजित असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. कारण आरोपींना नेमकी रक्कम कुठे आहे याची माहिती असल्याचे दिसून येते. त्यामुळे चोरट्यांनी फराज सिद्दिकी यांचा मागोवा घेतला असण्याची शक्यता वर्तवली जात आहे. सदर परिसरातील सीसीटीव्ही फुटेज पोलिसांकडून तपासले जात असून, चोरटे कोणत्या वाहनातून आले, त्यांनी कुठल्या दिशेने पळ काढला, याचा शोध घेण्यात येत आहे. पोलिसांनी या घटनेची गांभीर्याने दखल घेतली असून, लवकरात लवकर आरोपींना पकडण्याचा विश्वास दिला आहे. ही घटना भरदिवसा शहरात घडल्यामुळे नागपूरकरांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. विशेषतः व्यावसायिक वर्गामध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण झाली आहे.

# पालकमंत्री ना.मकरंद पाटील यांचा जिल्हा दौरा...

जनसंचलन/बुलढाणा

राज्याचे मदत व पुनर्वसन मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री ना. मकरंद पाटील हे दोन दिवशीय दि. १ व २ ऑगस्ट २०२५ रोजी बुलढाणा जिल्हा दौऱ्यावर येत आहेत. दौऱ्यादरम्यान ते अतिवृष्टी भागाची पाहणी व नैसर्गिक आपत्ती बाबत आढावा घेणार आहे. त्यांच्या दौरा कार्यक्रमानुसार दि. ३१ जुलै रोजी सायंकाळी ५.३० वाजता मुंबई येथून ता. लोणार जि. बुलढाणाकडे रवाना. शुक्रवार दि. १ ऑगस्ट रोजी रोजी रात्री १ वाजता शासकीय विश्रामगृह, लोणार येथे आगमन व राखीव. त्यानंतर सोईनुसार अतिवृष्टी भागाची पाहणी. सायंकाळी ४ वाजता जिल्हाधिकारी कार्यालय, बुलढाणा येथे नैसर्गिक आपत्ती बाबत आढावा बैठक. बैठकीनंतर शासकीय विश्रामगृह बुलढाणा येथे आगमन व राखीव.



शनिवार दि.२ ऑगस्ट रोजी राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी कार्यकर्ता बैठक. त्यानंतर सोईनुसार पुणेकडे रवाना होतील.

पत्रकारीतेचा धर्म
आम्ही निभावणार
सिटी न्यूज बुलडाणा
सिटी न्यूज टीव्ही & सोशल चॅनल
वेब साईड & पोर्टल चॅनल
वृत्त पेपर हार्ड कॉपी सह - ई पेपर
कुठली ही बातमी निशुल्क
***
दैनिक निडर निर्भिड
जनसंचलन
काही तक्रार असल्यास संपर्क
शिव शॉपिंग कॉम्प्लेक्स, कारंजा चौक बुलडाणा मो.9822720784,9373359040
पिन 443001

# धाड ग्रामपंचायत मध्ये ३.५ कोटीच्या भ्रष्टाचाराचा आरोप!

जनसंचलन/बुलढाणा

तालुक्यातील धाड ग्रामपंचायत मध्ये जवळपास ३.५ कोटी रुपयांच्या भ्रष्टाचाराचा आरोप करत माजी सरपंच व विद्यमान ग्रामपंचायत सदस्य रिजवान सौदागर व इतर सदस्यसह ग्रामसेवकाला ग्रामपंचायत मध्ये कोंडून ठेवले आहे. जोपर्यंत आम्हाला १५ वित्त आयोगाच्या निधीचा हिशोब मिळत नाही तोपर्यंत कोणालाही ग्रा.पं. भवनाच्या बाहेर जाऊ देणार नाही,अशी भूमिका आंदोलनकर्त्यांनी घेतल्याने प्रशासनात एकच खळबळ उडाली आहे.



धाड ग्रामपंचायत च्या सरपंच व ग्रामसेवकांनी संगणमत करून मोठ्या प्रमाणावर १५ वित्त आयोगाच्या निधीत भ्रष्टाचार केलेला आहे.प्रामुख्याने डस्टबिन खरेदी,धूर फवारणी, घनकचरा व्यवस्थापन, आरोग्य शिबिर अशा कामावर निधी काढण्यात आल्याचा आरोप माजी सरपंच रिजवान सौदागर यांनी केला आहे.या संदर्भात त्यांनी अनेक वेळा तक्रारी केलेले आहे परंतु ग्रामविकास अधिकाऱ्याकडून हिशोब दिला जात नाही.यालाच कंटाळून माजी सरपंच रिजवान सौदागर यांनी आपल्या समर्थक ग्रामपंचायत सदस्यासह ग्राम विकास अधिकाऱ्याला आज ३१ जुलै रोजी दुपारी १२ वाजेपासून ग्रामपंचायतच्या इमारतीत कोंडून ठेवले आहे. सायंकाळी ६ वाजेपर्यंत हे आंदोलन सुरूच होते. त्यामुळे प्रशासनात एकाच खळबळ उडालेली आहे. जोपर्यंत निधीचा हिशोब मिळत नाही तोपर्यंत आंदोलन मागे घेणार नसल्याची भूमिका आंदोलनकर्त्यांनी घेतलेली आहे. या पुढे काय होणार हे येणारी वेळ सांगणार आहे.

# जिल्ह्यात आजपासून महसूल सप्ताहाला सुरुवात; नागरिकांनी सहभागी व्हावे- जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील

जनसंचलन/बुलडाणा

राज्य शासनाच्या निर्देशानुसार यावर्षी दि. १ ऑगस्ट रोजी ङ्गमहसूल दिनफआणि १ ते ७ ऑगस्ट या कालावधीत ङ्गमहसूल सप्ताह २०२५फ साजरा करण्यात येणार आहे. महसूल विभागाच्या विविध कामकाजाचा आढावा घेणे, उत्कृष्ट अधिकारी व कर्मचाऱ्यांचा गौरव करणे, तसेच नागरिकांपर्यंत विभागाच्या सेवा आणि योजना पोहोचविणे, या हेतूने सप्ताहभर विविध उपक्रम राबविण्यात येणार आहे. या उपक्रमाचा लाभ अधिकाधिक नागरिकांना मिळावा यासाठी नागरिकांना सहभागी करुन घ्यावे, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी केले आहे.



महसूल सप्ताहाच्या निमित्ताने महसूल विभागाकडून समाजाच्या विविध घटकांपर्यंत सेवा पोहोचवण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. यादरम्यान, महसूल दिनाच्या शुभारंभप्रसंगी कार्यरत आणि सेवानिवृत्त अधिकारी-कर्मचाऱ्यांचा सत्कार, तसेच उत्कृष्ट अधिकारी व कर्मचाऱ्यांना सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात येणार आहे. त्याचबरोबर लाभार्थ्यांना विविध योजनांचे प्रमाणपत्रेही वितरित करण्यात येतील. सप्ताहाच्या पुढील दिवसांमध्ये २०११ पूर्वीपासून शासकीय जमिनीवर अतिक्रमण करून राहणाऱ्या पात्र कुटुंबांना पट्टे वाटप, पाणंद आणि शिवार रस्त्यांची मोजणी करून त्यांच्या दुतर्फा वृक्षलागवड, मंडळ स्तरावर छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानाचे आयोजन, तसेच लाभार्थ्यांच्या घरी भेट देऊन डिबीटी प्रक्रिया पूर्ण करणे, हे महत्त्वाचे उपक्रम राबवले जाणार आहेत. तसेच, शासकीय जमिनीवरील अतिक्रमण हटवणे, शर्तभंग प्रकरणांबाबत निर्णय घेणे आणि शासनाच्या एम-सँड धोरणाची प्रभावी अंमलबजावणी करून महसूल सप्ताहाची सांगता करण्यात येईल. राज्य शासनाने महसूल प्रशासनातील पारदर्शकता वाढवून जनतेचा विश्वास संपादन करण्यासाठी अशा प्रकारच्या उपक्रमांना प्राधान्य दिले आहे. यानुसार, जिल्हाधिकारी कार्यालयाच्या मार्गदर्शनाखाली प्रत्येक दिवशी ठराविक विषयांवर विशेष मोहिमा राबवण्यात येणार आहेत.

# अल्पसंख्याक समाजापर्यंत शासनाच्या योजना पोहोचवा- ललित गांधी

## जैन अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळाचे अध्यक्ष यांनी घेतला विविध विषयाचा आढावा...

जनसंचलन/बुलडाणा

जैन अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळाचे अध्यक्ष (राज्यमंत्री दर्जा) तथा राज्य अल्पसंख्याक आयोगाचे सदस्य ललित गांधी यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हा प्रशासनासोबत बैठक घेऊन जिल्ह्यातील अल्पसंख्याक बहुल ग्रामीण व नागरी क्षेत्रविकास कार्यक्रमासह अल्पसंख्याकांना देण्यात येणाऱ्या विविध योजनांचा आढावा घेतला. शासनाच्या विविध योजनाचा लाभ अल्पसंख्याक समाजाच्या शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवावा, असे आवाहन त्यांनी यावेळी केले. जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन सभागृहात आयोजीत बैठकीमध्ये जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील, जिल्हा परिषदेच्या उपमुख्य कार्यकारी अधिकारी बी.एम. मोहन, जिल्हा नियोजन अधिकारी राहुल पवार यांच्यासह संबंधित यंत्रणेचे अधिकारी, कर्मचारी आदी उपस्थित होते. महामंडळाचे अध्यक्ष ललित गांधी म्हणाले की, अल्पसंख्याक समुदायाची लोकसंख्या विचारात घेवून जिल्ह्यात पायाभूत सुविधा उपलब्ध करुन देणे गरजेचे आहे. यासाठी अल्पसंख्याक समुदायाचे वर्गीकरण करणे आवश्यक असून कोणताही समाज विकासापासून वंचित राहू नये यासाठी सर्वांनी प्रयत्न करावे. अल्पसंख्याक समुदायाच्या भागातील रस्ते, सभागृहाची राहिलेली अपूर्ण कामे वेळेत पार पाडावी. बुलढाणा जिल्ह्यातील जैन समाजाच्या प्राचिन मंदिरांना तिर्थक्षेत्र दर्जा मिळण्यासाठी प्रस्ताव सादर करावेत, असे निर्देशही त्यांनी दिले. जिल्हा उद्योग केंद्राकडील अल्पसंख्याक समुदायासाठी ३ टक्के राखीव असलेली कर्ज प्रकरणे तातडीने मार्गी लावावी. तसेच व्यवसाय कोणत्या पध्दतीने केला पाहिजे यासाठी जिल्हा उद्योग केंद्र आणि बँकांनी शिबीरे घेवून गरजवंतांना कर्ज मंजूर करावेत, असे सूचना दिल्या. तसेच जिल्ह्यातील अल्पसंख्याक समाजाच्या विकासासाठी जास्तीत जास्त निधी देण्यासाठी प्रयत्न केला जाईल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. भगवान महावीर निर्वाण कल्याणक निबंध स्पर्धाचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेमध्ये जिल्हास्तरावर निवड झालेल्या स्पर्धेकांना जैन अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळाचे अध्यक्ष तथा राज्य अल्पसंख्याक आयोगाचे सदस्य ललित गांधी यांच्या हस्ते नियोजन भवन सभागृहात प्रमाणपत्र व धनादेश वितरण करण्यात आले. यामध्ये निधी भन्साली, चंदन देशमाने, रिध्दी मेहत्रे, श्रावणी गायकवाड, ऋतुजा चेके, दिव्या औतकर, अरहिंत बोरुंदीया, श्रेयश परसाने, लबांधी खातोड व समृद्ध चिंचोले यांना पारितोषिक देण्यात आले.






दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ ९८२२७२०७८४ ऑफिस :- ९१२९५८२९५८